# पाचवी परीक्षा प्रश्नपत्रिका २०१५

उमेदवाराचे नाव ______________________________ वय____________

पत्ता ____________________________________________________

परीक्षा केंद्र ______________________________________________

परीक्षा संचालकाचे नाव ________________________________________

परीक्षा संचालकाची सही ______________________ तारीख _____________

लेखी परीक्षा गुणदान

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | लेखी गुण | एकूण गुण (निम्मे गुण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | इतर विषयी माहिती | सामान्य ज्ञान माहिती | कविता गाणी | श्रवण प्रश्नोत्तरे | वाचन प्रश्नोत्तरे | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | ५ | १० | १० | १५ | १५ | ६० |

एकूण गुण

/ १००

प्रश्न क्र.१ अ) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. ८ गुण

रॉकी पर्वत रांग ही उत्तर अमेरिका खंडातील, कॅनडापासून अमेरिकेच्या न्यू मेक्सिकोपर्यंत पसरली आहे. ह्या पर्वत रांगेची लांबी ३,००० मैल आहे. अमेरिकेच्या कॉलोराडो राज्यातील माउंट एलबर्ट (उंची:१४,४३९ फूट), हे या रांगेतील शिखर आहे.

जगातील सर्वांत विशाल ॲन्डीज पर्वत रांग, दक्षिण अमेरिकेतील सात देशांमधे पसरलेली आहे. १३,००० फूट उंचीची ही पर्वत रांग ४,३०० मैल लांब आहे !

भारतीय उपखंडातील हिमालय पर्वत रांग जगप्रसिद्ध आहे. ह्या पर्वत रांगेची लांबी २,४०० मैल आहे. माउंट एव्हरेस्ट हे शिखर २९,०३५ फूट ऊंच आहे!

अमेरिकेतील ॲपलेशियन पर्वत रांगेची लांबी १,५०० मैल व उंची ३००० फूट आहे.

प्रश्न१. जगातील सर्वोच्च शिखराची उंची किती आहे?

प्रश्न२. ॲन्डीज पर्वत रांग किती देशांमधे पसरलेली आहे?

प्रश्न३. रॉकी पर्वतरांगेपेक्षा अर्ध्या लांबीची पर्वत रांग कोणती?

प्रश्न४. माउंट एलबर्टची उंची दुप्पट झाली तर किती होईल?

प्रश्न क्र.१ ब) खालील अंक वापरून २, सहा आकडी संख्या बनवा.
संख्या अंकात आणि शब्दात लिहा. २ गुण
(१, २, ५, ७, ८,९)

| | अंकात लिहा | शब्दात लिहा |
|---|---|---|
| | | |
| १ | ___ ___ ___ ___ ___ ___ | ------------------------------------------------ <br> ------------------------------------------------ |
| २ | ___ ___ ___ ___ ___ ___ | ------------------------------------------------ <br> ------------------------------------------------ |
| | | |

प्रश्न क्र.२ खाली दिलेल्या कोणत्याही **<u>एका</u>** विषयावर वर्तमानपत्रासाठी बातमी लिहा. ( ८-१० वाक्ये) १० गुण

कला किंवा क्रीडा क्षेत्रातील घटना / अपघात / भूकंप

प्रश्न क्र.३ खालीलपैकी कोणत्याही **<u>एका</u>** विषयावर निबंध लिहा. १० गुण
( १०-१५ वाक्ये)

अविस्मरणीय अनुभव / मराठी भाषा का शिकावी / शंभर वर्षानंतर जग असे असेल..

प्रश्न क्र.४ अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा. ५ गुण
( ५-६ वाक्ये)

१)शाळेमधे नवीन क्लब सुरू करण्याबद्दल शिक्षकांना विनंती /

२)दिवाळी फराळाचे पार्सल मिळाल्याचे आजीआजोबांना कळवणे /

३)समाजातील कोणत्याही एका समस्येबद्दल पंतप्रधान / राष्ट्राध्यक्षांना पत्र

प्रश्न क्र.४ ब) खालील वाक्प्रचाराचा अर्थ लिहा. वाक्प्रचाराचा अर्थ स्पष्ट होईल अशा १-२ वाक्यांत उपयोग करा. ५ गुण

अ)घशाला कोरड पडणे: अर्थ- ______________________

वाक्ये- ______________________

______________________

______________________

आ)हरभऱ्याच्या झाडावर चढवणे: अर्थ- ______________________

वाक्ये- ______________________

______________________

______________________

इ)हताश होणे: अर्थ- ______________________

वाक्ये- ______________________

______________________

______________________

ई)कामाचे चीज होणे: अर्थ- ______________________

वाक्ये- ______________________

______________________

______________________

उ)फस्त करणे: अर्थ- ______________________________

वाक्ये- ______________________________

______________________________

______________________________

प्रश्न क्र.५अ) अधोरेखित शब्दांच्या जागी त्या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द वापरा आणि आवश्यक ते बदल करून अर्थपूर्ण वाक्य लिहा. ४ गुण

उदाहरण:

प्रश्न- यशला *जास्त* मते मिळाली म्हणून तो निवडणूक *जिंकला.*

उत्तर- यशला *कमी* मते मिळाली म्हणून तो निवडणूक *हरला.*

१) आम्ही सहज भटकायला निघालो, तर वाटेत बरेच ओळखीचे लोक भेटले.

______________________________

२) विहीर उथळ होती आणि पाणीही अस्वच्छ दिसत होते.

______________________________

प्रश्न क्र.५ब) अधोरेखित शब्दांच्या जागी त्या शब्दाच्या समानार्थी शब्द वापरा आणि आवश्यक ते बदल करून अर्थपूर्ण वाक्य लिहा. ४ गुण

उदाहरण:

प्रश्न- मांजराचे पिल्लू हरवल्यामुळे राधा *फार दु:खी* झाली.

उत्तर- मांजराचे पिल्लू हरवल्यामुळे राधा *खूप उदास* झाली.

१)प्राणी संग्रहालयात निरनिराळ्या तऱ्हेचे पक्षी व प्राणी आढळतात.

______________________________

२) कोणत्याही सणाला आमच्या दादाची मजा बघावी. नवीन कपडे घालून प्रचंड ऐटीत असतो.

_______________________________________________

प्रश्न क्र.५क) शब्दाचे योग्य रूप वापरून गाळलेल्या जागा भरा. २ गुण

उदाहरण:

(फूल)- फुलांची आवड असली की फुलं हवीहवीशी वाटतात.

१) (कारखाना)- _____________ निघालेला धूर गावापर्यंत पोहोचला. _____________ मालकाने धुराची नीट सोय करायला हवी.

२) (बाई)- हळदी कुंकू हा _____________ सोहळा असतो. आज आमच्या शेजारच्या _____________ हळदी कुंकू आहे.

प्रश्न क्र.६ खालील वाक्ये वाचून बरोबर  किंवा चूक  अशी खूण करा. १० गुण

१)आपल्या आकाशगंगेत एकच सूर्य आहे._______

२)विषारी रसायने जलचरांना पोषक असतात. _______

३)ज्ञानेश्वरांनी रेड्याकडून गीता वदवून घेतली. _______

४)रस्ता ओलांडताना सैरावैरा धावत सुटावे. _______

५)रवींद्रनाथ टागोरांना गीतांजली ह्या काव्याकरता नोबेल पारितोषिक मिळाले. _______

६)वणव्यामध्ये जंगलं पेटतात आणि झाडे जळतात. _______

७) संत ज्ञानेश्वर यांना तीन भावंडे होती. _______

८)महाराष्ट्र राज्याची निर्मिती ९ मे, १८६० साली झाली . _______

९) मराठी भारताची राष्ट्रभाषा आहे. _____

१०)गणपती पौष महिन्यात येतात. _______

प्रश्न क्र.७ योग्य शब्दाभोवती गोल करा. १० गुण

१)इंग्रजांनी भारतावर __________ केले.
( राज्य / कृपा / अभिवादन )

२)माझी मैत्रीण फारच ________ होती. ती सारखे प्रश्न विचारीत असे
( शांत / चौकस / हौशी )

३)डोंगर माथ्यावरून अप्रतिम दृश्य दिसत होते. अर्थात ________ छान देखावा दिसणारच!
( दरीतून / शिखरावरून / गुहेतून )

४)पृथ्वीवरील प्रदूषण कमी करणे आपले ________आहे.
( कारस्थान / करमणूक / कर्तव्य )

५)मतदान :________
( स्वयंसेवक / गुलामी / निवडणूक )

६) पृथ्वीभोवती चंद्राची एक प्रदक्षिणा:__________

( ग्रहण / पंधरवडा / महिना )

७)आकाशातून पडणारे पाणी: ________
( उल्का / रेती / वृष्टी )

८)सर्वांत मोठी संख्या कोणती: ________
( कोट्यावधी / शेकडो / हजारो )

९)विद्या देणारा ________
( शिष्य / विद्यार्थी / गुरु )

१०)ह्या सणाला पूर्ण चंद्र असतो.: ________
(नारळी पौर्णिमा / दिवाळी / दसरा )

प्रश्न क्र.८अ) खालील उताऱ्याचे इंग्रजीतून मराठीत भाषांतर करा. ५ गुण

It is no wonder that smart phones are so popular these days. A cell phone can be used to call anyone from anywhere. But they have many more uses besides making a phone call.
We can check emails, look at photos and play games on these phones. Calendars, alarm clock and flashlight are on the phone too.
Cell phones have become an important part of life.To the extent, that people get so lost in their phones that they can neglect each other!

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

प्रश्न क्र.८ ब)खालील उताऱ्याचे मराठीतून इंग्रजीत भाषांतर करा. ५ गुण

आम्ही नाताळच्या सुट्टीत कँपिंगला गेलो. बाबा तर निसर्गप्रेमी आहेतच पण आमची आईसुद्धा साहसी आहे. डोंगर दऱ्यातून ट्रेकिंग करणे हा तिचा आवडता छंद!
चार तासाचा प्रवास संपवून, हिरव्यागार जंगलात तंबू देखील उभा केला. अरुंद पायवाटेने टेकडीच्या पायथ्यापाशी असलेल्या निळ्याशार तळ्याकडे उत्साहात निघालो. नदीवर होडीतून चक्कर मारणे , पाण्यावरचे पक्षी पाहणे , नंतर शेकोटीभोवती जेवण आणि झोपायच्या आधी झगमगत्या ताऱ्यांचे निरीक्षण असा झकास कार्यक्रम होता.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------